**रे.दि.मु.** नं.**११४/२०२१**

**नि. क्र.४२ सोबत**

प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.४ **यांचा उलटतपास** वादीतर्फे विधीज्ञ श्री.जे.**एम.मेटकरी** यांचेमार्फत **शपथेवर सुरु-**

माझे शिक्षण एम.कॉम पर्यंत झाले आहे. मी दि कराड अर्बन बँक शाखा फलटण येथे २० वर्षे नोकरी केली आहे. मला नि.क्र.२७ वरील खरेदीखत दाखवण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतावर लिहून देणार म्हणून माझे नाव आहे व लिहून घेणार म्हणून वादीचे नाव आहे. तसेच, संमती देणार म्हणून प्रतिवादीच्या पतीचे म्हणजेच युसूफ कमरुद्दीन शेख तसेच हवाबी जैनुद्दीन खान, जस्मीन जाफर शेख व आरिफा युनूस शेख यांची नावे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखतातील संपुर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, हाडकोचे १३३ व १३४ असे दोन ब्लॉक होते. मी ब्लॉक क्र.१३४ हा माझ्या वडिलांनी प्रतिवादीच्या पतीला दिल्याबाबत कागदपत्र दाखल करण्यास तयार आहे. (प्रतिवादीचे वकिल यांचे म्हणणे आहे की, कागद दाखल आहे.) हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखत नि.क्र.२७ मध्ये असे नमुद आहे की, मिळकत सर्वे नं.६४७५ अ हाडको कॉलनीमधील ब्लॉक क्र.१३३ व १३४ याचा नगरपालिका मिळकत क्र.११९४ असा आहे. हे म्हणणे खरे नाही की, ब्लॉक नं.१३४ हा माझ्या वडिलांनी माझ्या भावाला/प्रतिवादीच्या पतीला दिला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, ब्लॉक नं.१३३ व १३४ ला वादीची नोंद आहे. साक्षीदार सांगतो की, त्यांनी पैसे देवून केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावाच्या मृत्युनंतर ब्लॉक नं.१३४ हा त्याची पत्नी शबाना यांच्या नावावर झाला आहे हे मी खोटे सांगत आहे. माझ्या भावाच्या मृत्युनंतर ब्लॉक नं.१३४ हा त्याची पत्नी शबाना यांच्या नावावर झाला आहे हे दाखवण्यासाठी माझ्याकडे कागद नाही. हे म्हणणे खरे नाही की, ब्लॉक नं.१३४ मध्ये प्रतिवादी, तिचा पती व दोन मुले गेली २५ वर्षापासून राहत आहेत हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा भाऊ युसूफ याच्या मृत्युनंतर त्याची पत्नी व मुले हे ब्लॉक नं.१३४ मध्ये राहत आहेत हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात संपुर्ण मजकूर खोटा कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांच्या सांगण्यावरुन मी

आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

स्थळ : फलटण. (ए.एस.साटोटे)

दिनांक: १२.११.२०२५ २ रे सह दि.न्या.क.स्तर, फलटण.